# अर्जदाराचे हमीपत्र

प्रति,

मा. आयुक्त,

अमरावती महानगरपालिका, अमरावती

**विषय: प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र.३: (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) या घटकांतर्गत लाभ मिळण्यासाठी अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या प्रधानमंत्री आवास योजना ऑनलाईन प्रणाली मध्ये हमीपत्र सादर करीत असल्याबाबत.**

मा.महोदय,

मी ____________________ प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) या घटकांतर्गत लाभ मिळण्याबाबत अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या प्रधानमंत्री आवास योजना ऑनलाईन प्रणाली मध्ये ऑनलाईन अर्ज केलेला होता, माझा ऑनलाईन अर्ज क्रमांक ____________ हा आहे. त्यानुसार मी माझ्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी अमरावती म.न.पा – शहर स्तरीय तांत्रिक कक्षाकडून केल्यानंतर कागदपत्र तपासणी मध्ये पात्र ठरविण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मध्ये लाभ मिळण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेच्या केंद्र व राज्य सरकारने निर्गमित केलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून व खालीलप्रमाणे नमूद असलेल्या मुद्यांना अनुसरून स्वखुशीने प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

1. माझे किंवा माझ्या कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे भारतात कुठेही पक्के घर नसून मी माझ्याकुटुंबासमवेत भाड्याच्या घरात राहत असून माझे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपये किंवा ३ लाख रुपये पेक्षा कमी आहे.
2. अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मिळणाऱ्या सदनिकेची किंमत ही अंदाजे ९.०० लक्ष रुपये आजच्या घटकाला ठरविण्यात आली आहे. परंतु बाजारभावाप्रमाणे या सदनिकेच्या प्रस्तावित रकमेपेक्ष १० ते १५ % वाढ होऊ शकते हे मला ज्ञात असून मान्य आहेत व त्या करिता माझा काहीही आक्षेप नाही.
3. अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून पात्र झाल्यावर शासनाकडून रुपये २.५० लक्ष प्रति लाभार्थी असे अनुदान मिळणार असून उर्वरित रक्कम अंदाजे रुपये ६.५० लक्ष मला लाभार्थी हिस्सा म्हणून मी किंवा माझ्या कुटुंबाला द्यायची आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी** ____________

4. सदर लाभार्थी हिस्सा हा मी देण्यास तयार असून तो कर्ज किंवा इतर माध्यमातून उभा करण्यासाठी मी तयार आहे व सदर निधी मी स्वतः उभा करणार आहे अथवा आयुक्त, म.न.पा. अमरावती यांनी ठरविलेल्या नियमांच्या अधीन राहील.

5. अमरावती म.न.पा. क्षेत्रात कोणताही जागेवर सदनिका मिळाल्यास मला मान्य राहील. जागा व सदनिकेबाबत माझा कुठलाही आक्षेप राहणार नाही.

6. सदर घरकुल अमरावती म.न.पा. च्या जागेवर बांधण्यात येत असल्याने सदर इमारत ४ माळ्यापर्यंत असल्याने केंद्र सरकार यांनी ठरविलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार मिळालेला माळा व सदनिका मला मान्य राहील.

7. कुठल्याही कारणास्तव जर मी ठरल्याप्रमाणे २ टप्प्यापर्यंत हफ्ता न भरू शकल्यास मी लाभार्थी म्हणून अपात्र होईल याची मला जाणीव आहे व ते मला मान्य राहील.

8. सदनिकेच्या बांधकामाची अंदाजे वेळापत्रक हे २४ महिने असून सदनिकेची संपूर्ण किंमत अदा केल्यावर ताबा मिळेल हे मला मान्य असून ताबा मिळाल्यावर सदर सदनिका मी विकणार नाही किंवा भाड्याने देणार नाही.

9. मला मिळालेल्या सदनिकेव्यतिरिक्त मी इतर खुल्या जागेवर ताबा घेणार नाही, असे आढळल्यास म.न.पा. अमरावतीच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र असेल.

10. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मध्ये माझे लाभार्थी म्हणून निश्चित करण्यासाठी मी ४९,००० रू फक्त अनामत रक्कम जमा केल्यानंतर लाभार्थी म्हणून निश्चित करण्याचे सर्व अधिकार म.न.पा. ला आहे जर अनामत रक्कम भरल्यानंतर मी किंवा माझे कुटुंब लाभार्थी म्हणून अपात्र ठरविण्यात आले तर माझी अनामत रक्कम बिनव्याजी (कोणतेही व्याज न देता) मला परत मिळेल याची मला जाणीव असून त्यासाठी माझी काहीही आक्षेप राहणार नाही.

11. **अर्जदाराला सेतू केंद्रामध्ये जाऊन हमीपत्र ऑनलाईन पद्धतीने भरताना मा. आयुक्त अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या नावे रू. ४९,000 चा डी.डी. काढून डी.डी. ची प्रत ऑनलाईन हमीपत्रासोबत सोबत जोडणे अनिवार्य आहे, त्याशिवाय हमीपत्र ग्राह्य धरल्या जाणार नाही.**

## सदनिकांची विक्री किंमत व ती भरणा करावयाच्या अटी व शर्ती:-

1. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती असून अमरावती महानगरपलीका, अमरावती यांना सदनिकेच्या किंमत व दर अंतिम करण्याचा व त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या रकमेत संख्येत वाढ वा घट करण्याचा अंतिम अधिकार राहील.

**अर्जदाराची स्वाक्षरी** ____________________

2. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकांचे ताबापत्र स्थानिक स्वराज्य संस्थेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पाठविण्यात येईल. तत्पूर्वी अर्जदारांची पात्रता निश्चित करून पात्र/अपात्रतेचा निर्णय म.न.पा. अमरावतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

3. अर्जदाराची पात्रता निश्चित झाल्यावर त्यास तात्पुरते देकारपत्र अमरावती महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेच्या कार्यालयातून पत्राद्वारे देण्यात येईल. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकेची किंमत अदा करण्यासाठी/भरण्यासाठी पुढील वेळापत्रकानुसार टप्या–टप्प्याने किंमत भरावयाची आहे याची मला पूर्णता जाणीव आहे. तात्पुरते घर निश्तितीबाबत ऑनलाईन हमीपत्र जाहीर केल्यापासून २० जून २०१७ पर्यंतच अनामत रक्कम जमा करण्याचा कालावधी ग्राह्य धरला जाईल.

4. दिनांक २० जून २०१७ पर्यंतच अनामत रक्कम ४९,००० रु रक्कम लाभार्थी निश्चित करण्याची प्रक्रिया म्हणून भरणे बंधनकारक आहे.

5. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकेची उर्वरित रक्कम लाभार्थ्याला टप्प्या–टप्प्याने देणे बंधनकारक राहील. सदनिकेची किंमत विहित मुदतीत अदा करणे बंधनकारक आहे. सदनिकेची किंमत अदा करण्यात कसूर केल्यास किंबहूना न भरल्यास सदनिका रद्द करण्यात येईल व सदनिकेच्या किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण केली जाईल. उर्वरित रक्कम कोणत्याही प्रकारचे व्याज न देता अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

6. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील कागदपत्रे पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांना सदनिकेची १००% रक्कम एकाच टप्यामध्ये (एक रकमी) भरावयाची आहे, असे अर्जदार एक रकमी म्हणजेच १००% रक्कम भरू शकतात.

7. अनामत रक्क्म ४९,००० रु लाभार्थी निश्चित होण्याकरिता भरणा केल्यानंतर व सदर अर्जदार लाभार्थी म्हणून निश्चित झाला तर अर्जदाराने मागणी केल्यास कोणत्याही वित्तीय संस्थेकाडून कर्ज प्राप्त होण्यासाठी म.न.पा. अमरावती "ना हरकत प्रमाण पत्र" देण्यात येईल. त्याकारीता अर्जदाराने लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.

8. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मध्ये लाभार्थी म्हणून निश्चित झाल्यानंतर अर्जदाराने सदनिका नाकारल्यास अथवा अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम विनाव्याज रु.१०००/– इतकी रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करून परत करण्यात येईल.

9. अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास अथवा अर्जदार अंतिमतः अपात्र ठरला तर त्याची अनामत रक्कम रु.१०००/– इतकी रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करून उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल.

**अर्जदाराची स्वाक्षरी** ______________________

10. अर्जदार किंवा त्याचे पती/पत्नीने किंवा कुटुंबातील व्यक्तीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात/विविध घटकात अर्ज केल्यास अर्ज सोडती मध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना मिळून एकाच प्रवर्गात/घटकात एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या घटकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जासाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज रू. १०००/– इतकी रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करून देण्यात येईल.

11. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकेचा ताबा पत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारली किंवा कोणत्याही करणास्तव वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करून उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता परतावा करण्यात येईल. अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रकमेचा भरणा केल्यास तथा उपरोक्त समपहरण करावयाची रक्कम अनामत रकमेपेक्षा कमी भरल्यास, अर्जदारास अनामत रकमेचा परतावा करण्यात येणार नाही.

12. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकांसाठी पाणी पुरवठा म.न.पा. कडून केला जातो. सदनिकांचा ताबा देण्यापूर्वी पाणी पुरवठा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. तथापी त्यास विलंब झाल्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही याची जाणीव आहे.

13. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मध्ये यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबा पत्र अर्जदार व त्यांची पत्नी या दोघांच्या नावे देण्यात येईल. अर्जदार अविवाहित असल्यास अर्जदाराची सदनिका रद्द करण्यात येईल.

14. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकेची किंमत तातपुरती असून ती अंतिम झाल्यानंतर म.न.पा. सदनिकेची अंतिम किंमत निश्चित करेल. हि बदललेली किंमत निविदेमध्ये केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास हि वाढीव किंमत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. अंतिम सदनिका किंमत व निविदेमधील किंमत याचे फरकामुळे जर सदनिकांच्या किंमतीत वाढ झाली तर ती वाढीव रक्कम भरणे लाभार्थीवर बंधनकारक राहील.

15. महानगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल: निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थीस त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

16. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील सदनिकेची विक्री तसेच भाडेतत्वावर देता येणार नाही. सदनिकेची अनधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास सदनिकेचा ताबा घेवून संबंधित सदनिका धारकाविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल.

**अर्जदाराची स्वाक्षरी** ____________________

17. प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र. ३ (भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे) मधील यशस्वी व पात्र ठरलेल्या अर्जदारांच्या कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार मा. शहर अभियंता म.न.पा. यांना असून सदरहु अर्जावर मनपा द्वारे कार्यवाही करून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांचे वितरण रद्द करण्यात येईल. त्यावर अर्जदारास १५ दिवसाच्या आत मा. आयुक्त म.न.पा. अमरावती, याचेकडे अपील करता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

18. केंद्र व राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार सदनिकेच्या किंमतीवर लागणार सेवा कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर सदनिकाधारकांना भरावे लागतील.

अर्जदाराचे संपूर्ण नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

संपर्क क्रमांक : ____________________

____________________

**अर्जदाराची स्वाक्षरी**